जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

## प्रेसनोट दिनांक - २६/११/२०२३

### स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे शहर

### २६/११ दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली अर्पण

आज दिनांक २६/११/२०२३ रोजी सकाळी ०९/३० वा.चे दरम्यान स्वारगेट पोलीस स्टेशनचे हद्दीत सारसबाग याठिकाणी पुणे शहर पोलीस दल व सेवा मित्र मंडळ ट्रस्ट यांचे संयुक्त विद्यमानाने २६/११ हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली व शहिदांच्या स्मरणार्थ चित्रकला स्पर्धेचा व व खाऊ वाटपाचे आयोजन करण्यात आले.

सदरवेळी २६/११ हल्ल्यातील शहिद जवानांना मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा. अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे,श्री.रामनाथ पोकळे, मा.अप्पर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,श्री.संभाजी पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०२,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०५,श्री.विक्रांत देशमुख, मा.पोलीस उप-आयुक्त,विशेष शाखा,पुणे,श्री.आर.राजा, तसेच आमदार कसबा विधानसभा,महाराष्ट्र राज्य,श्री.रविंद्र धंगेकर, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग पुणे,श्री.नारायण शिरगांवकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,स्वारगेट पो स्टे पुणे शहर,श्री.सुनील झावरे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),स्वारगेट पो. स्टे. पुणे,श्री.सोमनाथ जाधव यांचे सह पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व अंमलदार यांनी शहिदांना मानवंदना देऊन,पोलीस मुख्यालया तर्फे शहिदांना सलामी देण्यात आली आहे. तसेच सेवा मित्र मंडळाचे पुणे अध्यक्ष,श्री.शिरीष मोहिते व पदाधिकारी त्याचप्रमाणे पुणे शहरातील इतर मान्यवरांसह चित्रकला स्पर्धेकरिता विद्यार्थी व शिक्षक हजर होते.

पुणे शहर पोलीस व सेवा मित्र मंडळ ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे शहरातील शालेय विद्यार्थी यांनी चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती. सदरच्या चित्रकला स्पर्धेला सुमारे ७००० ते ८००० वेग-वेगळ्या वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यावेळी शालेय विद्यार्थ्यांना वेग-वेगळ्या विषयावर चित्र काढण्यास सांगुन,त्यांना प्रशस्तीपत्र व बक्षिस वितरण करुन खाऊ वाटप करण्यात आला आहे.

सदरचा कार्यक्रम पुणे शहर पोलीस आयुक्तालय व सेवा मित्र मंडळ यांचेवतीने आयोजित करण्यात आला होता.



